**स.के.नं. ६६/२०२३**
**नि.क्र.५७/क च्या पुढे**

अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. ३ यांचा जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

| | | |
|---|---|---|
| माझे नाव | - | सचिन मोहनराव बोटे, |
| वय | - | ४० वर्षे |
| व्यवसाय | - | पोलीस हवालदार/२१०४ |
| राहणार | - | उरण पोलीस ठाणे, नवी मुंबई. |

**<u>सरतपासणी अभियोगपक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता पी. बी. देशमाने यांच्याद्वारे</u>**

१. दिनांक ११.१०.२०२१ रोजी मी उरण पोलीस ठाणे येथे कार्यरत असताना मला बंदोबस्ताकामी नेमण्यात आले होते. त्यादिवशी सकाळी ०७.०० ते रात्री ०९.०० वाजेपर्यंत माझी बंदोबस्ताकामी नेमणुक होती. त्या कालावधीत उत्तर प्रदेश येथील लखिमपुर येथे शेतकऱ्यांचा नरसंहार झाल्याची घटना घडलेली होती. त्यासंबंधी महाविकास आघाडी द्वारे आंदोलन करण्यात येणार होते. तेव्हा पोलीस आयुक्त यांचा मनाई आदेश लागू होता. तरीदेखील १०० ते १५० लोक जमले होते. आधी त्यांनी देऊळवाडी चौकात निर्दशने केली. त्यानंतर त्यांनी उरण शहरात पायी मोर्चा काढला. मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने पोलीस हवालदार जाधव याने फिर्याद दाखल केली होती. ज्यांचे विरूद्ध फिर्याद दिली होती ते आज न्यायालयात हजर आहेत.

**<u>उलटतपास आरोपी क्र. १ व ५ ते ८ तर्फे वकिल श्री. निनाद नाईक यांच्यामार्फत...</u>**

२. हे म्हणणे खरे आहे की, राजपाल नाक्यापासून वैष्णवी हॉटेल पर्यंतचा

परिसर गजबजलेला असतो. हे म्हणणे खरे आहे की, त्या परिसरात व्यावसायिकांची दुकाने व लोकांचे येणेजाणे सुरू असते. हे म्हणणे खरे आहे की, त्या परिसरात दोन ते तीन मंदिरे असून तेथे लोक येणेजाणे करत असतात. हे म्हणणे खरे आहे की, राजपाल नाक्यापासून वैष्णवी हॉटेल मोरा हा रस्ता उत्तर दक्षिण असा आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्या रस्त्याच्या पुर्व बाजूला गणपती मंदिर नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी घटनेच्या दिवशी जमुन मनाई आदेशाचे उल्लघंन केल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आज न्यायालयात हजर असलेले आरोपी घटनेच्या वेळी हजर होते हे मी खोटे सांगत आहे.

**उलटतपास आरोपी क्र. ३ तर्फे वकिल श्री. किशोर ठाकुर यांच्यामार्फत...**

३. पोलीस आयुक्तांच्या आदेशाचे वाचन मी केले होते. हे म्हणणे खरे आहे की, त्या आदेशाची प्रत मी तपास अधिकाऱ्यांना दिलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, प्रकरण दाखल होण्याआधीपासून मी आरोपींना चेहऱ्याने व नावाने ओळखत होतो. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासातील मजकूर खोटा सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास आरोपी क्र. ४ तर्फे वकिल श्री. अनुराग ठाकुर यांनी इतर आरोपींतर्फे घेतलेला इतर उलटतपास स्वीकारून उर्वरित उलटतपास**

४. हे म्हणणे खरे आहे की, निषेध करण्यासाठी घोषणा द्याव्या लागतात. हे म्हणणे खरे आहे की, निषेध करताना बॅनर वैगरे तयार केले जातात. हे म्हणणे खरे आहे की, माझे समक्ष कोणतेही बॅनर किंवा जाळलेला पुतळा जप्त केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासात सांगितल्याप्रमाणे आरोपींनी निषेध केलेला नाही. हे

म्हणणे खरे नाही की, शासनास मदत होण्यासाठी मी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासातील मजकूर खोटा सांगत आहे.

**<u>उलटतपास आरोपी क्र. ९ तर्फे वकिल श्री. जितेंद्र कातरणे यांनी आरोपी क्र. ३ तर्फे घेतलेला उलटतपास स्वीकारला.</u>**

उलटतपास पुर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत

**सही/-**

**उरण,** **(एस.पी. वानखडे )**

**दिनांक – ०५/०५/२०२६** **न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग,न्यायालय क्र.१ उरण**